

# ‘त्या’ दोन्ही नर्सेसचे निलंबन मागे घ्या!

## आरएमओ कार्यालयापुढे परिचारिकांची निदर्शने

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** - जिल्हा सामान्य रुग्णालय(इर्विन) येथील दोन अधिपरिचारिकांचे निलंबन करण्यात आले. या विरोधात मंगळवारी(दि.18) रुग्णालयातील अधिपरिचारिकांनी कामबंद आंदोलन केले. अचानक झालेल्या कामबंद आंदोलनामुळे रुग्णालय परिसरात तारांबळ उडाली होती. यावेळी प्रशासना विरोधात तीव्र नारेबाजी करत निषेध नोंदवला. निलंबन मागे घ्या, रुग्णालयात गुंडगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलिस कारवाई करावी, या मुख्य मागण्या रेटून धरण्यात आल्या होत्या.

एका सहा वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करण्यात आला होता. तिला जिल्हा सामान्य रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. मात्र ड्युटीवरील दोन अधिपरिचारिकांनी प्राथमिक उपचार करण्यास विलंब लावला असा आरोप करीत भिम ब्रिगेड संघटनेने आंदोलन केले होते. तसेच दोन्ही नर्सेसचे निलंबन करण्यात यावे. अशी मागणी रेटून धरली होती. तत्पूर्वी या प्रकरणात चौकशीही बसविण्यात आली. चौकशीच्या अहवालानुसार या दोन्ही नर्सेसचे निलंबन करण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस असोसिएशनच्या नेतृत्वात इर्विन रुग्णालयातील संतप्त अधीपरिचारिकांनी याचा निषेध व्यक्त केला. तसेच परिसरात तीव्र निदर्शने करून कामबंद आंदोलनाला सुरुवात केली. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे रुग्णालय परिसरात तारांबळ उडाली होती. यावेळी आंदोलनाचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौंदळे यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन आंदोलक नर्सेसचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळी डॉ. सौंदळे यांनी या संदर्भात आरोग्य विभागाचे उपसंचालक यांना पत्र व्यवहार करून न्याय देण्याचे आश्वासन दिले.

दोन दिवसांमध्ये यावर गांभीर्याने लक्ष देत दोन्ही नर्सेसचे निलंबन मागे घ्यावे. अन्यथा आगामी सोमवार पासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा यावेळी सर्व नर्सेसने दिला आहे. यावेळी वर्षा पागोटे, मनिष कांबळे, हर्षा उमक, साधना भोरे, रितू बैस, दुर्गा घोडिले, बबिता बागडे, विद्या चुडे, सपना वाट, ज्योती तायडे, वैशाली नगराळे, ममता चव्हाण, प्रमिला कांबळे, शालिनी केवाडे, आकाश भालेराव, हरीश कातकर, आशा दाभाडे यांच्यासह अन्य नर्सेस सहभागी झाल्या होत्या.

# चेन स्नॅचिंग करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचे दोन सदस्य गजाआड

## 21 गुन्ह्यांचा छडा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )**- अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट-2 ने मोठी कारवाई करत आंतरराज्यीय चेन (मंगळसुत्र) स्नॅचिंग करणाऱ्या टोळीतील दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत 21 जबरी चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लागला असून आरोपींकडून 8 लाख रुपये किमतीचे 100 ग्रॅम सोने जप्त करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी



पत्रकार परिषदेत या घटनेची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 3 जानेवारी 2025 रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात एका नागरिकाने तक्रार दिली होती की, दोन दुचाकीस्वारांनी त्याची सोनसाखळी हिसकावून नेली. तक्रारीनंतर, गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे तपास सुरू केला. यामध्ये हसन अली उर्फ आशु नियाझ अली (वय 21, रा. भुसावळ) आणि शेख जुबेर शेख निसार (रा. अमरावती) हे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.

### शेख जुबेर ने पुरविली माहिती

तपासादरम्यान, हसन अलीने आपल्या साथीदारांसोबत अमरावती आणि इतर जिल्ह्यांत अनेक चैन स्नॅचिंगच्या घटना केल्याची कबुली दिली. शेख जुबेरने या टोळीला शहरातील ठिकाणांबद्दल माहिती पुरवली आणि त्यांना आश्रय दिला. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सांगितले की, या यशस्वी कारवाईसाठी पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने अतिशय प्रभावी कामगिरी केली. तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्यात आली आणि त्यांना अटक करण्यात आली. सध्या, टोळीतील इतर आरोपी फरार असून पोलिसांचा त्यांचा शोध सुरू आहे.

# ऐन घाटात एसटी चे स्टेअरींग फेल

## परतवाडा-तुकईथड बसमधील प्रवाशांच्या जीवाचा थरकाप

**परतवाडा,( दि.18 )** - परतवाडा आगाराच्या भंगार एसटी बसेस नेहमी प्रवाशांच्या जीवावर उठलेल्या पहायला मिळतात. मंगळवारी(दि.18) अशीच एक घटना समोर आली. ज्यामध्ये एमएच 40/6164 क्रमांकाची परतवाडा-तुकईथड बस चे बिहाली नजिक घाटात स्टेअरिंग फेल झाले. स्टेअरिंग काही झाले तरी फिरत नसल्याने एका प्रवाशांने मदत करुन चालकाला बस सुरक्षित ठिकाणी पोहोचविण्यास मदत केली. या घटनेमुळे बसमधील प्रवाशांच्या जीवाचा थरकाप उडाला होता.



# गळफास घेऊन नवविवाहितेची आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** - पतीसोबत वाद झाल्यानंतर एका विवाहित महिलेने गळफास लावून आत्महत्या (दि.18) केली. वैशाली आकाश दंदे (27, राहणार लक्ष्मी नगर, यवतमाळ, हल्ली मुक्काम नांदुरा, पीएस वलगाव) असे मृत महिलेचे नाव आहे. पतीसोबत वाद झाल्यानंतर वैशाली नांदुरा येथे आपल्या आई-वडिलांच्या घरी राहत होती. दरम्यान ती मानसिक तणावात होती. त्यामुळे तीने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे. या घटनेच्या माहितीवरून वलगाव पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. वैशाली यांचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयातील शवगारात ठेवण्यात आला आहे.

# जय शिवाजी, जय भारत पदयात्रा आज

**अमरावती** - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 395व्या जयंतीनिमितत बुध्वार, दि. 19 फेबुवारी रोजी ‘जय शिवाजी - जय भारत पदयात्रा’चे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी 7.30 वाजता सायन्सस्कोर मैदान येथून पदयात्रेला सुरवात होणार आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सकाळी 7.30 वाजता देशाला संबोधीत करतील. त्यानंतर सकाळी 8 वाजता पदयात्रेला सुरवात होणार आहे. पदयात्रा सायन्सस्कोर मैदान, शिव टेकडी, जिजाऊ पुतळा, बियाणी चौक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पंचवटी चौकमार्गे निघून विभागीय क्रिडा संकुल येथे समारोप होणार आहे.

**ग्रामपंचायत कार्यालय, धोतरखेडा. पं.स. अचलपूर जि. अमरावती.**

निविदा सूचना क्रं. ०१/दि.१७/०२/२०२५


**ग्राम पंचायत ईसापूर पं.स. अचलपूर जि. अमरावती. द्वारे विविध योजनेअंतर्गत खालील विकासात्मक कामे करीता बी-१ पध्दतीने निविदा नोंदणीकृत कंत्रांटदाराकडून मागविण्यात येत आहे. इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदारांनी आपली निविदा दिलेल्या मुदतीच्या आत सादर करावी .**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फी | अनामत रक्कम | योजनेचे नाव | सन |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बंधिस्त नाली बांधकाम सहदेव डोंगरे ते सुनिल कोकदे | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | | |
| २ | बंधिस्त नाली बांधकाम राजु बेलोकर ते जयश्रीराम ठोसर | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | | |
| ३ | बंधिस्त नाली बांधकाम रामदास बेटे ते सुंदरलाल चौधरी | १ लक्ष ५० हजार रुपये | १५० रुपये | १५०० रुपये | | |
| ४ | बंधिस्त नाली बांधकाम बापूराव तायवाडे ते रामदास वरखडे | २ लक्ष रुपये | २०० रुपये | २००० रुपये | | |
| ५ | बंधिस्त नाली बांधकाम शेख शब्बीर ते मेन रोड | ५० हजार रुपये | ५० रुपये | ५०० रुपये | | |
| ६ | बंधिस्त नाली बांधकाम नरेंद्र खेरडे ते जयेश चर्जन | ८७ हजार ४२४ रुपये | १०० रुपये | १००० रुपये | | |
| ७ | बंधिस्त नाली बांधकाम शिंगाडे ते शेख जहीर | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | १५ वित्त आयोग | २०२४-२५ |
| ८ | पाईप लाईन सार्वजनिक शौचालय पाईप लाईन धोतरखेडा | १ लक्ष रुपये | १०० रुपये | १००० रुपये | | |
| ९ | पेव्हींग ब्लॉक बसविणे धोतरखेडा व येणी वार्ड क्र. २ व ४ मध्ये | १ लक्ष ८८ हजार १७३ रुपये | २०० रुपये | २००० रुपये | | |
| १० | ग्राम पंचायत कार्यालय ISO करणे दुरुस्ती इतर कामे | २ लक्ष २५ हजार रुपये | २५० रुपये | २५०० रुपये | | |
| ११ | पेव्हींग ब्लॉक बसविणे देविदास श्रीधर खेरडे ते देविदास लोंदे चौक | १ लक्ष ५० हजार रुपये | १५० रुपये | १५०० रुपये | | |
| १२ | पेव्हींग ब्लॉक बसविणे येणी वार्ड आंगणवाडी समोर | १ लक्ष ५० हजार रुपये | १५० रुपये | १५०० रुपये | | |
| १३ | नाली व रपटे बांधकाम नसीम बेग ते सुरेंद्र ढगे | २ लक्ष ३० हजार ५३८ | २५० रुपये | २५०० रुपये | | |
| १४ | नाली व रपटे बांधकाम स्वाती ठोंगे ते निलेश पटारे | १ लक्ष ६४ हजार ६६९ | १५० रुपये | १५०० रुपये | १५ वित्त आयोग | २०२४-२५ |
| १५ | स्मशानभूमी मध्ये बोअर व मोटरपंप साहित्य | २ लक्ष १२ हजार ४२४ रु. | २५० रुपये | २५०० रुपये | | |
| १६ | वार्ड क्रं. २ मध्ये सिमेंट कॉंक्रीट नाली बांधकाम किसन मावस्कर पेव्हींग ब्लॉक वार्ड क्र. ३ नागोबा मंदिर ते अजिंक्य खेरडे बसविणे | ४ लक्ष ५० हजार रुपये | ४५० रुपये | ४५०० रुपये | | |
| १७ | सार्वजनिक व वैयक्तीक कचरा कुंडया खरेदी करणे | २ लक्ष रुपये | २०० रुपये | २००० रुपये | नागरी सुविधा विशेष अनुदान | २०२४-२५ |
| १८ | चर्जन ट्रेडर्स ते ओं कार काजे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | ३ लक्ष ५० हजार रुपये | ३५० रुपये | ३५०० रुपये | | |

**अटी व शर्ती,**

१. निविदा प्रसिध्द करणे. दि.१९/०२/२०२५
२. निविदा मिळणे व स्विकारणे, दि. २०/०२/२०२५ ते २६/०२/२०२५ पर्यंत
३. निविदा उघडणे, दि. २७/०२/२०२५ शक्यतो.
४. सर्व नियम व अटी ग्रा.प. नोटीस बोर्डवर पहावयास मिळतील.
५. निविदा दोन लिफाफा पध्दतीने पुर्ण भरलेली मुदतीच्या आत स्विकारल्या जाईल.
६. निविदा स्विकारणे किंवा रद्द करणे ग्रा.प. कार्यालय धोतरखेडा यांनी राखुन ठेवले आहे.

सरपंच / सचिव
ग्राम पंचायत धोतरखेडा




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शेतकऱ्यांचे ओळखपत्र नोंदणी संकेतस्थळ कधी बंद तर कधी चालू!

## शेतकऱ्यांना माराव्या लागताहेत सेतू केंद्रावर चकरा

### शेतकरी ओळखपत्र



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी( दि.18 )** - सरकारकडून फार्मर आयडी (ओळखपत्र) शेतकऱ्यांनी काढून घ्यावे असे आवाहन करण्यात आले आहे, मात्र प्रत्यक्षात ही नोंदणी संकेतस्थळ (साईट) कधी बंद तर कधी चालू राहत असल्याने शेतकऱ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या शेतकऱ्यांचे ओळखपत्र काढण्याचे काम सुरु आहे. मात्र संकेतस्थळ व्यवस्थित चालत नसल्यामुळे फार्मर आयडी काढण्यासाठी शेतकऱ्यांना सेतू केंद्रावर वारंवार चकरा माराव्या लागताहेत. ओळखपत्र काढल्याशिवाय मिळणारे अनुदान पीएम किसान, अतिवृष्टी मदत, पीक विमा यासह इतर योजनांचा लाभ मिळणार येत नसल्याचे सांगण्यात येत आहे.

अनेक योजना या ऑनलाईन माध्यमातून शासनाकडून शेतकऱ्यांना देण्यात येत असतात, परंतु अर्ज भरण्याच्या वेळेस संकेतस्थळ बंद असल्याने अनेक योजनांपासून अनेक शेतकऱ्यांना वंचित रहावे लागते की काय अशी भीती लागली आहे. या समस्येवर तोडगा काढण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

> “अनेक वेळा शासनाच्या माध्यमातून विविध लाभाच्या योजना राबविण्यात येत असतात, परंतु या साईटमुळे शेतकरी वंचित राहत आहेत.
>
> **आलोक अलोकार**
> **सेतू संचालक.**

### मोबाईल नेटवर्कची बोंब

फार्मर आयडी तयार करण्यासाठी शहरापासून गाव पातळीवरही मोठ्या प्रमाणात महसूल विभागाच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. गाव स्तरावर तसेच सेतु केंद्रामध्येही सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. परंतु शेतकऱ्यांना नेटवर्क समस्या व सर्व्हर डाऊनच्या समस्येमुळे नोंदणी करण्यास अडचणी येत आहेत. ज्यामूळे संकेतस्थळाची लिंक वारंवार निष्क्रीय होत आहे.

### संकेतस्थळात अनेक अडचणी

> “शेतकरी ओळखपत्र काढताना संकेतस्थळ सुरळीत चालत नाही, आधार ओटीपी येत नाही. एडिटवर क्लिक केले तर तालुका येत नाही, गट नंबर व्हेरिफाय होत नाही. झालं तर संपूर्ण केस पेंडिंग दाखवते, या समस्येवर कायमचा तोडगा काढण्याची गरज आहे.
>
> **नरेंद्र टाले, शेतकरी, चुरणी.**

# संत रविदास यांनी विश्वाला मानवधर्माची शिकवण दिली

## प्रमोद पोकळे यांचे प्रतिपादन | बडनेरात गुरु रविदास जयंती उत्साहात साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)** - मनुष्य हा जातीने नाही तर कर्माने श्रेष्ठ ठरतो. त्याचे मन शुद्ध व पवित्र असले की, त्याला गंगेत स्नान करण्याची गरज भासत नाही. गुरु रविदास महाराजांनी वर्णभेद व जातीभेद झुगारून माणसाने धर्म जात व धर्म भेदाच्या पलीकडे जात मैत्री व बंधुभावाने वागण्याचा मानवतावादी विचार संपूर्ण विश्वाला दिला, असे प्रतिपादन जिल्ह्यातील दूरदर्शन व आकाशवाणी लोककलावंत तसेच अ. भा. श्री गुरुदेव सेवा मंडळाचे जीवन प्रचारक प्रमोद पोकळे यांनी केले.

बडनेरा जुनीवस्तीतील चर्मकार समाज बांधवांच्या वतीने दुर्गा माता चौकात श्री संत रविदास महाराज यांचा जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रमोद पोकळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. राजीव जामठे हे होते. प्रकाश शेलापुरकर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक प्रा. भास्कर भटकर, वनस्कर, शामा आकोडे, पांडुरंग खंडारे, निलेश जामठे, उत्तमराव भैसने, विजय शेगोकार, रामकृष्ण लांडोरे, अर्चना धामणे, छाया अंबडकार प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते संत गुरु रविदास महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रमोद पोकळे व संचाने भजन गायनाचा कार्यक्रम सादर केला. त्यात प्रशांत दुधे, निलेश बिरहा, डॉ. मोहन पोकळे, राजेंद्र इंगोले, सुभाष सुने, गणेश खंडार, अरविंद अंबडकार, अशोक रूमने, राजेश टारपे आदी कलावंत सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश जामठे यांनी तर संचालन प्रशांत दुधे यांनी केले. पांडुरंग खंडारे यांनी आभार मानले. या कार्यक्रमात बडनेरा शहरातील धार्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मंडळींचा तसेच चर्मकार समाजातील ज्ञानेश्वरी पटके हिचा पोलीस मध्ये नियुक्ती झाल्याबद्दल व आरती काटेकर हिचा वैद्यकीय पदवी मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला माजी नगरसेवक विजय नागपुरे, शाम बडनेरकर, सुरेश दुधे, धनराज कंटाळे, रमेश इंगोले, किशोर अंबाडकर, मुकेश उसरे, मधुकर श्रीखंडे, कृष्णराव पारडे, हरिश्चंद्र कहाळे, नामदेव निकोरे, विठ्ठल मोहोळ, विजय लसणकर, धिरु मारवे, संजय चवरे, राजेंद्र दाभाडे, प्रा. मिलींद चिरडे, महेश पारडे, कवी उसरे, मनोहर पटके, रवी उसरे, दुर्योधन दाहेदार, दिलीप वाजगे, मोहन पटके, दिलीप गाठेकर, मंगेश गव्हाळे, सुधाकर सत्रनकर, रंगराव गव्हाळे यांच्यासह गणमान्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शरद ठोसरे, शंकर गव्हाळे, बंडू सत्रनकर, सुरेश ठोसरे, अनिकेत गव्हाळे, अवधूत जोगे, सुनील मांगे, संतोष गव्हाळे, नरेश सत्रनकर, राजेश गव्हाळे, बंडू धामणे, मोतीराम गव्हाळे, राजेंद्र पटके, गजानन गव्हाळे, देविदास जोगे, सोपान गव्हाळे, संतोष सत्रनकर, मंथन गव्हाळे व समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

# संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथी साजरी





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)** आशापुरी सोनार महिला मंडळ व श्री संत नरहरी सेवा समितीच्या वतिने 15 फेब्रुवारी रोजी संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथी जुनी कोतवाली परिसरातील भाजी बाजार येथे मोठ्या थाटात साजरी करण्यात आली. यावेळी समाज बांधवांनी काढलेल्या शोभा यात्रेने अमरावती दुमदुमली होती.

शोभायात्राच्या सुरुवातीला महाराजांच्या चांदीच्या पादुकांचा समाजातील दांपत्याच्या हातुन अभिषेक करण्यात आला. या अभिषेकाला समाजातील वरिष्ठ मंडळी कार्यकारी महिला कार्यकारणी अध्यक्ष संगीता गजाननराव खडेकर, सचिव कुंदा विजयराव अनासाने, सहसचिव अर्चना गणेशराव मुरोडकर, कोषाध्यक्ष सरिता चंद्रकांत गौड, सहकोषाध्यक्ष प्रियंका राहुल करुले, विशाखा प्रवीण हरमकर यांची उपस्थिती होती. या पुरुष कार्यकारणी अध्यक्ष ओंकारराव जानराव अनासाने, उपाध्यक्ष दीपक आत्माराम गुरुमाळे, सचिव विलासराव मोहनराव अनासाने, कोषाध्यक्ष सचिनराव विश्वनाथपंथ मरोळकर यांचीही उपस्थिती लाभली. शोभायात्रेची शोभा वाढविण्यासाठी बँड,दिंडी, पालखी, तुळजाभवानी घोडे, पताका सादरीकरण व महिलांचा टाळ नाद ठेवण्यात आले, सोबतच रोशनाई सुद्धा करण्यात आली, परिसरातून ठिकठिकाणी पालखीचे स्वागत घेण्यात आले. समाजातील गुणवत्ताप्राप्त व प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला खोलापुरी गेट पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पाथरे हे देखील उपस्थित होते. लहान मुलांना त्यांनी उत्तम मार्गदर्शन केले, लहान मुलांनी अध्यात्मिक वेशभूषा सादरीकरण सादर केले. शोभायात्रा निघाल्यानंतर रस्त्यामध्ये ठीक ठिकाणी समाजातील लोकांनी पालखीचे पूजन करुन स्वागत करण्यात आले. ठीक ठिकाणी शरबत व आईस्क्रीम वाटप करण्यात आले. महिलांनी चौका चौकात माऊली गाण्यावर टाळांचा नाद करीत पताका सादरीकरण केले. महिलांनी परिधान केलेल्या हिरवी साड्या व भगवे फेटे ही शोभायात्रेचे वेगळे शोभा वाढवणारे होते. महाआरतीनंतर सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. समाजातील महिला व पुरुषांनी खूप मोठ्या संख्येने उपस्थित राहुन सहभाग दर्शविला.

# निंभारी डेपोतील वाळूचा सोमवारी लिलाव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** - निंभारी, ता. अचलपूर येथील वाळूडेपोची मुदत संपुष्टात आली आहे. डेपोतून वाळू विक्रीनंतर शिल्लक असलेला वाळूसाठा 1 हजार 66 ब्रास जप्त करण्यात आला आहे. या वाळूचा सोमवार, दि. 24 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता लिलाव करण्यात येणार आहे.

सदर वाळूसाठ्याचा लिलाव करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे निर्देश आहेत. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, अचलपूर यांनी जाहीरनामा काढण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, अचलपूर यांच्या दालनात लिलाव करण्यात येणार आहे. या जाहीर लिलावात इच्छुक व्यक्ती, संस्था आणि शासकीय विभागांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कोंडेश्वर मंदिराचे जीर्णोद्धार कार्य अविरत सुरू राहावे

## जितेंद्रनाथ महाराज यांचे उद्गार ● मंदिर जीर्णोद्धाराचा सुवर्ण महोत्सव साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, (दि. 18)** - कोंडेश्वर या अतिप्राचीन शिव मंदिराचे जीर्णोद्धार कार्य सुरू झाल्यानंतर आतापर्यंतच्या पन्नास वर्षांच्या कालावधीत या मंदिराने प्रगतीचा मोठा टप्पा गाठला आहे. देणारा भगवान शिव अर्थात कोंडेश्वर आहे. आपण केलेला संकल्प पूर्ण करून जीवन सार्थकी लावावे. कोंडेश्वर मंदिराचे जीर्णोद्धार कार्य असेच अविरत सुरू राहील, ते अनंत आहे. असे उद्गार अंजनगाव सुर्जी येथील देवनाथ मठाचे मठाधीपती जितेंद्रनाथ महाराज यांनी काढले.

श्रीक्षेत्र कोंडेश्वर येथील प्राचीन शिवमंदिराच्या जीर्णोद्धार कार्याला प्रारंभ होऊन 50 वर्षांचा कालावधी पूर्ण झाला आहे. त्यानिमित्त रविवार, 16 फेब्रुवारी रोजी कोंडेश्वर मंदिराच्या सभागृहात सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी जितेंद्रनाथ महाराज बोलत होते. कार्यक्रमाला मालखेडच्या अंबादेवी संस्थानचे महंत शिवानंद पुरी महाराज, श्री गजानन महाराज विजय ग्रंथाच्या वाचक संध्याताई देशपांडे, संस्थांनचे अध्यक्ष रमेश पकडे, विश्वस्त महादेवराव चकुले प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. देव, देश आणि धर्माकरिता आपण सदैव तत्पर राहून धार्मिक विकासाकरिता आपले जीवन सार्थकी लावावे, असे आवाहनही जितेंद्रनाथ महाराज यांनी यावेळी बोलताना केले. याप्रसंगी श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण करण्यात आले. सुमारे 300 महिला पुरुष गजानन भक्तांनी यावेळी विजय ग्रंथाचे वाचन केले. संध्याताई देशपांडे यांनी मुख्य वाचक म्हणून भूमिका पार पाडली. येत्या 26 फेब्रुवारीला महाशिवरात्री असून त्यानिमित्त संस्थानच्या वतीने 16 ते 27 फेब्रुवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम पार पडणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थानचे अध्यक्ष रमेश पकडे, सचिव रवींद्र बारापात्रे, सहसचिव प्रफुल्ल वाठ, खजिनदार रामकृष्ण लांडोरे, विश्वस्त डॉ. वीरेंद्र वसु, महादेव चकुले, सुरेश टेटू, आशिष अग्रवाल, प्रमोद सत्रनकर, सुनील पकडे आणि जीर्णोद्धार समितीने केले आहे.



# प्रकटदिनानिमित्त श्रीविठ्ठल गाथा संत चरित्र कथा सप्ताह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)** - पूर्णानगर येथे गजानन महाराज प्रकटदिनानिमित्त गजानन महाराज मंदिरामध्ये श्रीं च्या प्रकटदिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्रीविठ्ठल गाथा संत चरित्र कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थानच्या वतीने ह.भ.प.गजानन अढाऊ महाराज रा. चंडिकापूर ता. अकोट यांच्या अमृततुल्य वाणीतून साजरा होत असून यात सावता माळी महाराज नामदेव महाराज व ज्ञानेश्वर माऊली यांच्या भेटीचे दृश्य सादर करण्यात आले. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

13 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजता तीर्थस्थापना होऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली, तर दैनंदिन कार्यक्रमांमध्ये सकाळी पाच ते सहा काकडा आरती, दुपारी दोन ते सहा श्रीविठ्ठल गाथा संत चरित्र कथा सायंकाळी 6 ते 7.30, हरिपाठ, रात्री 8 ते 11 भजन होत आहे, तर वारकरी सांप्रदायिक भजन मंडळ रामा काळा हनुमान मंदिर हिंमतपूर वातोंडा, कल्याण भजन मंडळ पूर्णानगर व त्रिनेत्र भजन मंडळ पूर्णानगर, दुर्गा माता भजन मंडळ पूर्णानगर, रामार्पण सुंदरकांड भजन मंडळ येलकी पूर्णा, पूर्णानगर, मोतीराम बाबा भजन मंडळ मार्की हे सात दिवस सेवा देणार आहे. 16 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 7 ते 9 अनघा शुक्ला व संच अमरावती यांचा भक्ती गीताचा कार्यक्रम पार पडला आहे. 19 फेब्रुवारी रोजी दुपारी 4 वाजता दत्त मंदिर ते गजानन महाराज मंदिर पालखी सोहळा निघणार आहे. या सोहळ्यात परिसरातील भजनी मंडळ सहभागी होणार आहे, तर 20 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजता ह. भ. प. गजानन अढाऊ यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाला सुरुवात होणार आहे. सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शहरात जिकडे तिकडे प्लास्टीक पन्नीचा सडा

## अमरावती शहरात प्लास्टिक बंदीचा फज्जा ● महापालिका प्रशासनाच्या कारवायांना जुमानेना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)** - पर्यावरणाचे संवर्धनाच्या अनुषंगाने राज्य शासनाने 50 मायक्रान जाडीपेक्षा प्लास्टिक पन्नीसह थर्माकॉलवर बंदी घातली आहे. या अनुषंगाने महापालिकेचा चमु दररोज शहरातील व्यवसायीकांची तपासणी करून कारवाईदेखील करीत आहेत. परंतू तरीही शहरात जिकडे-तिकडे प्लास्टीकच्या पन्नीचा खच पाहायला मिळत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाच्या कारवायांना व्यवसायीक वर्ग जुमानत असल्याचे दिसून येत आहे. यावरून अमरावती शहरात प्लास्टीक बंदीचा फज्जा उडाल्याचे चित्र दिसत आहे.

महापालिका अधिनियम 1949 च्या तरतुदीनुसार महापालिकांनाही प्लास्टीक बंदीसाठी दंडात्मक कारवाईचे आदेश देण्यात आले आहे. परंतू याबाबतची नियमावली करूनही शहरात प्लास्टीक बंदी कागदावरच असल्याचे दिसत आहे. शासनाने बंदी घातलेल्या सिंगल युज प्लास्टीकने बाजारपेठा, व्यापारी संकुले व सार्वजनिक ठिकाण वेढलेले आहे. शहरात एकीकडे स्वच्छतेचा बोजबारा वाजला असता, प्लास्टीक निर्मुलनाचे मोठे आवाहन महापालिकेसमोर उभे ठाकले आहे.





### नाले, नाल्या तुंबल्या प्लास्टीक कचऱ्याने

प्लास्टिक नष्ट होण्यासाठी किमान 500 वर्षे लागतात. त्यामुळे प्लास्टिकचे प्रमाण पाहता भविष्यात पर्यावरणावर मोठे संकट निर्माण होण्याची शक्यता वाढलेली आहे. शहरातील बहुतांश नाल्या व मोठे नाले प्लास्टीक पन्नीने तुंबल्या आहेत. त्यामुळे पाणी प्रवाहाचाही प्रश्न निर्माण झालेला आहे. अशा स्थितीत शहराचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.

### हातगाड्यांवर सर्रास वापर

प्लास्टीक पन्नी वापरावर बंदी असताना, शहरातील काही खाद्य पदार्थ बनविणारे, भाजीपाला, फळ विक्रेता आणि किराणा व्यवसायीक हे प्लास्टीकच्या पिशव्या वापरतच आहे. त्यामुळे या प्लास्टीकच्या पन्या घरोघरी पोहोचत आहे. काम संपले की त्याच प्लास्टीक पन्नी एक तर कचरा कुंडीत किंवा बाहेरील आवारात फेकल्या जात आहे. त्यामुळे शहरातील बहुतांश सार्वजनिक ठिकाणी प्लास्टीकच्या पन्नीचा खच गोळा होत असल्याचे दिसत आहे.

### नागरिकांसह जनावरांचेही आरोग्य धोक्यात

प्लास्टीकचा वापर हा मानवी आरोग्याला धोकादायक ठरू शकतो. कारण अनेक जण प्लास्टीक पन्नी जाळतात. त्यामुळे यातून निघणारा धुर हा मानवी आरोग्यास धोकादायक ठरत आहे. अशातच प्लास्टीक पन्नीमध्ये टाकाऊ अन्न पदार्थ टाकून, ती पन्नी कचरा कुंडी किंवा बाहेरील आवारात फेकल्या जात आहे. त्यामुळे अनेकदा हे प्लास्टीकमधील खाद्य पदार्थ खाण्यासाठी जनावरे गोळा होताना दिसत आहे. यामध्ये गोवंश जनावरे खाद्य पदार्थांसह प्लास्टीक पन्नी सुध्दा खात आहे. त्यामुळे ही प्लास्टीक पन्नी गोवंश जनावरांच्या पोटात जात आहे. अनेकदा गोवंशीय जनावरांवर शस्त्रक्रिया करून या प्लास्टीकच्या पन्नीचे गोळे बाहेर काढण्यात आले आहे.

### जंगलातही प्लास्टीक, वन्यप्राण्यांनाही धोका

शहरातील अनेक जण जंगल मार्गाने जात असताना, प्लास्टीक पन्नी बाहेर फेकून देतात. तर अनेकदा जंगलात पार्टी करणारे प्लास्टीक पन्नीचा वापर करून, त्या जंगलातच फेकून देतात. यासोबतच शहरातील प्लास्टीकचा कचरा हा जंगलालगतच्या मोकळ्या जागेत किंवा नाल्यांमध्ये फेकल्या जात आहे. हा प्रकार जंगलातील वन्यप्राण्यांसाठी धोकादायक ठरत आहे, अशी माहिती वन्यप्रेमी निलेश कंचनपूरे यांनी दिली.

# अचलपूर, चांदूरबाजार, शिवसेना (उबाठा) कार्यकारणी जाहीर

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपुर** - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे (अचलपूर मेळघाट विधानसभा) यांनी अचलपूर शहर, चांदूरबाजार तालुक्यातील ग्रामीण व शहर पदाधिकारी यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.

अचलपुर उप तालुका प्रमुख म्हणून शंकरराव वाटाणे (असदपुर सर्कल), मुरलीधर पडोळे (गौरखेडा, धामणगाव सर्कल), भास्करराव सुरसाऊत (पथ्रोट सर्कल) संगम बोंडे (शिंदी सर्कल) मनोहर कोथलकर( अचलपूर शहर) , टिल्लू शर्मा (परतवाडा शहर व कांडली सर्कल), माणिक देशपांडे (समन्वयक अचलपूर शहर), नंदकुमार काळे (संघटक अचलपूर शहर), जिल्हा परिषद नुसार विभाग प्रमुख अक्षय पावडे (धामणगाव गढी), सुहास कोंडे (कांडली), वासुदेव तोटे (गौरखेडा कुंभी), नितिन घटाळे (पथ्रोट), समाधान गाडगे (शिंदी), माधव राउत (असदपुर), अचलपूर पंचायत समिती गण प्रमाणे उपविभाग प्रमुख मनिष खवले (धामणगाव गढी), राजू काळे (खरपी), गोकुल अ. इंगळे (कविठा), आनंद प्र. गणोरकर (कांडली), सुदर्शन आखरे (गौरखेडा कुंभी), नरेंद्र काळे (वडगाव फ.), खुशाल आनंद गायन (परसापुर), यश संतोष नागे (पथ्रोट), प्रतीक नितिन येवले (शिंदी), प्रकाश उ. रताळे (रासेगाव), शाम प्रकाशराव शेंडे (बोरगाव पेठ), नरेंद्र विठ्ठलराव अकोलकर (असदपुर), अचलपूर शहराचे उप शहर प्रमुख पन्ना गौर, निकेश पिंपळकर, रामदास हागे, सै. सलिमोद्दीन, परतवाडा शहर पदाधिकारीमध्ये उप शहर प्रमुख नितिन पोटे, सुधीर देशमुख, विलास डोंगरे, परतवाडा शहर संघटक मुरली नंदवंशी, परतवाडा शहर समन्वयक गोवर्धन मेहरा, परतवाडा शहर प्रशिंदी प्रमुख राजेश डांगे, परतवाडा शहर विभाग प्रमुख किशोर काळे, साजीत काजी, सोहेनखान, अतिश मोरे, पवन खडसे, विक्की राठोड,

चांदूरबाजार तालुका पदाधिकारीमध्ये उप तालुका प्रमुख मोहन रघुवंशी, अनिल साइंदे, चांदूरबाजार जि. प. गट प्रमाणे विभाग प्रमुख विजय गुलक्षे (शिरजगाव कसबा), दादाराव तायडे (ब्राम्हणवाडा थडी), रुषिकेश सतिशराव रडके (सोनेरी), पवन राऊत (शिरजगाव बंड), निलेश पवार (करजगाव), शंकरराव भेटाळु (आसेगाव), चांदूरबाजार तालुका प. स. गणाप्रमाने उपविभाग प्रमुख अमोल गाडगे (शिरजगाव कसबा), गोकुळ रावसाहेब खुळे (देऊरवाडा), विक्रम फुकट (घाट लाडकी), चक्रधर पेठे (ब्राम्हणवाडा थडी), रविंद्र वानखडे (सोनोरी), नशिम अहेमद (बेलोरा), सुधीर आगरकर (कारंजा बहिरम), मोहीत राऊत (थुगाव पिंप्री), सागर शंकरराव मेटकर (आसेगाव), विषम विश्वनाथ नेवारे (तळवेल) यांचा समावेश आहे.

# बडनेरा पोलिसांच्या कारवाईत जबरी चोरीचा आरोपी अटक



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.18 )-** शहरातील बडनेरा पोलिस स्टेशनने जबरी चोरीच्या प्रकरणी मोठी कारवाई केली असून पोलिसांनी आरोपी शाकीर मोहम्मद उर्फ भोलू नुर मोहम्मद (वय 55 वर्ष) याला अटक केली आहे. ही घटना 14 सप्टेंबर 2024 रोजी घडली, जेव्हा फिर्यादी भावेश अशोक थोरात आणि त्याचे मित्र अंजनगाव बारी रोडवरील रायसोनी कॉलेजच्या बाजूस बसून गप्पा मारत होते. त्याच वेळी दोन अज्ञात इसमांनी त्यांना धमकावून त्यांच्याकडील मोबाइल फोन आणि इतर मौल्यवान वस्तू जबरदस्तीने हिसकावून घेतल्या.

फिर्यादीच्या मते, त्यांच्याकडून एक सॅमसंग टॅब, रेडमी मोबाईल आणि विवो मोबाईल तसेच 2000 रुपये रोख रक्कम आणि इतर वस्तू चोरून नेल्या, ज्याची एकूण किंमत 36,000 रुपये आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीची ओळख पटवून त्याला अटक केली. आरोपीकडून चौकशी केल्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून चोरीचे सामान जप्त केले, ज्यात सॅमसंग टॅब, रेडमी आणि विवो मोबाईल तसेच चोरीला वापरलेली मोटारसायकल समाविष्ट होती. या कारवाईत एकूण 1,44,000 रुपये किमतीचे सामान जप्त करण्यात आले, ज्यात इतर चोरीचे मोबाईलही समाविष्ट आहेत. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलिस आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बडनेरा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनील चव्हाण आणि त्यांच्या पथकाने केली आहे. बडनेरा पोलिसांच्या या कारवाईला गुप्त माहिती आणि जलद तपासासाठी मान्यता मिळत आहे.

# आझाद समाज पक्षाची नांदगाव खंडेश्वर येथे आढावा बैठक

## चार ग्रामपंचायत सदस्यांची केला पक्ष प्रवेश



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) –** आझाद समाज (काशीराम) पक्षाची (दि.16) नांदगाव खंडेश्वर येथील विश्रामगृहात महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मनीष साठे यांचे अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली तसेच यावेळी पक्षप्रवेश कार्यक्रमही घेण्यात आला.

या कार्यक्रमांमध्ये अनेकांनी पक्ष नेतृत्वावर विश्वास ठेवून आजाद समाज पक्षामध्ये प्रवेश घेत समर्थपणे पक्षाची जबाबदारी सांभाळण्याची शपथ घेतली.आजाद समाज पक्ष हा राजकिय पक्ष असला तरी ती एक आंबेडकरी चळवळ आहे. आंबेडकरी चळवळ ही सतत तेवत ठेवण्यासाठी प्रत्येक भारतीयांची व विशेषत- आंबेडकरवाद्यांची नैतिक जबाबदारी आहे,असे मार्गदर्शन यावेळी उपस्थितांना करण्यात आले.

तर प्रदेश अध्यक्ष मनीष साठे म्हणाले कि, आंबेडकरी चळवळ मजबूत व शक्तीमान करण्यासाठी आजाद समाज पक्षाची बहुजन समाजास अत्यंत गरज आहे, आगामी ग्रामपंचायत ,पंचायत समिती,जिल्हा परिषद,नगर परिषद,नगरपंचायत,महानगरपालिकाच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्धार व्यक्त करून एड.चंद्रशेखर आजाद यांचे हात मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान आझाद समाज पक्षात प्रवेश करणार्यांमध्ये धामणगाव रेल्वे तालुक्यातील तीवरा ग्रामपंचायत चे चार सदस्य सुखदेवराव उके,प्रवीण गणवीर, ऋतिक ताकसांडे यांनी जाहीर प्रवेश घेतला तसेच 25 फेब्रुवारी ला तीवरा येथे पक्षप्रवेशाचा व शाखा उघडण्याचा जाहीर कार्यक्रम आयोजित करण्याची घोषणा केली. धामणगाव रेल्वे मतदारसंघात पक्ष संघटन मजबुत करण्यावर यावेळी भर देण्यात आला. यावेळी आझाद समाज पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ देवरे, प्रदेश प्रवक्ता प्रा.प्रमोद मेश्राम, अमरावती जिल्हाध्यक्ष सनी चव्हाण, जिल्हा संघटक धर्मपाल पिलावल, शहराध्यक्ष विपुल चाहांदे, शहर उपाध्यक्ष रोहित अरगडे,जितू रामटेके, भूषण राऊत ,डॉ.जुबेर, अशोकराव इंगोले, ज्ञानेश गडलिंग यांच्यासह धामणगाव विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष लालचंद इंगोले यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# एसडीओ कार्यालयाच्या पाण्याच्या टाकीतून सतत गळती

■ दुर्लक्षामुळे लाखो लिटर पाण्याचा अपव्यय



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा,( दि.18 )-** परतवाडा शहरातील राजस्व कार्यालयाच्या मागील पाण्याच्या टाकीतून सतत पाण्याची धार सुरू राहत असल्याने लाखो लिटर पाणी व्यर्थ वाहून जात आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने 'जल ही जीवन है' असा संदेश देत पाणी बचतीचे आवाहन करणाऱ्या शासनाच्या भूमीके कडेच दुर्लक्ष केल्या जात असल्याचा प्रकार दिसुन येत आहे. राजस्व उपविभागीय कार्यालयाच्या मागील पाण्याच्या दोन प्लॅस्टीक टाक्या आहेत. या टाक्या भरण्यासाठी सतत नळ सुरू राहते. त्यामुळे टाकीतून मोठ्या प्रमाणावर पाणी धो-धो वाया जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून या टाकीतील गळती सुरू असून प्रशासनाने अद्याप कोणतीही उपाययोजना केलेली नाही. प्रशासनाने त्वरित यावर उपाययोजना करावी. या गळतीमुळे पाणी वाया जात असून त्या ठिकाणी चिखल आणि डबके साचत आहेत, त्यामुळे परिसरात अस्वच्छता पसरत आहे. तसेच दूषित पाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया आणि इतर रोग पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांनी प्रशासनाला त्वरित ही गळती थांबवून टाकीची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

# संत सेवालाल महाराजांना अभिवादन

**अमरावती –** संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपायुक्त संतोष कवडे, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# उन्हाळ्यातील शाळेच्या वेळेत बदल करा

## शिक्षणाधिकारी यांना प्राथमिक शिक्षक समिती चे निवेदन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) –** उन्हाळ्यातील सकाळच्या सत्रातील शाळेच्या वेळेत बदल करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती अमरावती च्यावतीने प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे यांच्याकडे (दि.14) निवेदनातून करण्यात आली.

दि.20 मार्चपासून जि.प.अमरावती अंतर्गत शाळा ह्या सकाळ पाळीत सुरू होणार आहेत. सद्या सकाळ शाळेची वेळ ही सकाळी 9 ते 12:30 अशी आहे.आता उन्हाळा सुरू झाला आहे. अमरावती मध्ये उष्णतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

त्यामुळे उष्णतेचे प्रमाण लक्षात घेता 20 मार्च पासून सुरू होणाऱ्या सकाळ पाळीमधिल शाळेच्या वेळात बदल करून ती सकाळी 7 ते 11:50 अशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली. शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी मागणी सहानुभूती पूर्वक ऐकून घेत लवकरच सकाळ शाळेच्या वेळा संबंधाने सकारात्मक निर्णय घेण्यात येईल,असे आश्वासत दिले. निवेदन देतेवेळी संभाजी रेवाळे,उमेश चुनकीकर,प्रफुल वाठ, शैलेंद्र दहातोंडे आदि उपस्थित होते, असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले.

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयाच्या एनएसएस शिबिराचे उद्घाटन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) –** इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर आष्टी येथे दि. 15 ते 22 फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. उद्घाटन रविवारी पार पडले आहे.उद्घाटन सोहळ्याला विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे कार्यकारणी सदस्य प्रा. गजानन काळे अध्यक्षस्थानी होते. आष्टीचे सरपंच दिलीप जवंजाळ यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजनेचे सल्लागार समिती सदस्य गणेश भारती यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा. काळे यांनी शिबिरार्थींनी शिबिरादरम्यान विविध उपक्रम राबवून सामाजिक जाणीव वृद्धिंगत करावी. तसेच गावातील समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन केले. विशेष शिबिरामधून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास करावा याबाबत मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. सीमा अढाऊ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अनुप आत्राम यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुणा तसरे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. वंदना भोयर, प्रा. वंदना हिवसे, डॉ. वामन जवंजाळ, उत्तमराव जवंजाळ, सुभाष नितनवरे, विशुद्ध जवंजाळ, आनंद जवंजाळ, सुनंदा जवंजाळ उपस्थित होते.

# श्री समर्थ गजानन महाराज मंदिरात प्रकट दिन महोत्सव

## माजी मंत्री यशोमती ठाकुर यांच्या हस्ते आरती





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.18 )-** येथील विवेकानंद कॉलनी परिसरातील श्री समर्थ गजानन महाराज मंदिरात प्रकट दिन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 13 ते 19 फेब्रुवारी पर्यंत शिव महापुराण कथेचे वाचन ह.भ.प. रवींद्र महाराज काळमेघ (जळका,शहापुर) यांच्या सुमधुर वाणीतून केले जात आहे. 20 फेब्रुवारी रोजी गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त शोभायात्रा , दिंडी, पालखीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर काल्याचे किर्तन होणार आहे, त्यानंतर लगेचच महाप्रसादचे आयोजन केले आहे. रोज संध्याकाळी कथेची सांगता महाआरतीने होत आहे. 17 फेब्रुवारीला यजमान म्हणून माजी मंत्री अ‍ॅड.यशोमती ठाकूर यांच्या हस्ते महाआरतीला करण्यात आली. तसेच संस्थांनाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. दररोज मोठ्याप्रमाणात महापुराण कथा ऐकण्यासाठी भाविकांची गर्दी येथे पहायला मिळत आहे.

# पेन्शन अदालत 5 मार्चला

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.18 ) –** भारतीय डाक विभागामार्फत पेन्शन अदालतीचे आयोजन दि. 5 मार्च रोजी सकाळी 11.30 वाजता मुख्य पोस्टमास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई - 400 001 येथे आयोजित करण्यात आली आहे.

निवृतिवेतनधारकांच्या लाभाशी संबधित तक्रारी, टपाल विभागातून निवृत्त झाले आहेत, ज्यांचा सेवेत असताना मृत्यू झालेला आहे, टपाल विभाग, महाराष्ट्र गोवा राज्याचे निवृत्तीवेतनधारक ज्याचे 3 महिन्याच्या आत पूर्तता झालेली नाही, अशा प्रकरणाचा डाक पेंशन अदालतीमध्ये विचार केला जाणार आहे. निवृत्ती वेतनधारकानी विहित नमुन्यात अर्जाच्या तीन प्रति लेखा अधिकारी तथा सचिव, पेन्शन अदालत, मुख्य पोस्टमास्तर जनरल कार्यालय, महाराष्ट्र सर्कल, मुंबई जीपीओ भवन, दुसरा मजला मुंबई - 400001 या पत्यावर पाठवावे, असे आवाहन अमरावती डाक विभागातर्फे करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून दूरसंचाराच्या उत्तम सुविधा विकसित करा

## खा.अनिल बोंडे यांचे प्रतिपादन

## दूरसंचार सल्लागार समितीची बैठक



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती –** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताची वेगवान वाटचाल सुरू आहे. अशा काळात दूरसंचाराच्या सुविधांपासून ग्रामीण क्षेत्रही मागे राहता कामा नये, यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून दूरसंचाराच्या उत्तम सुविधा विकसित कराव्या, असे प्रतिपादन राज्यसभेचे सदस्य डॉ.अनिल बोंडे यांनी येथे केले. येथील भारत संचार निगम लिमिटेडच्या विभागीय कार्यालयात सोमवारी (ता.17) दूरसंचार सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीदरम्यान डॉ.अनिल बोंडे हे बोलत होते. यावेळी खा.बळवंत वानखडे, महाप्रबंधक माधुरी निमजे, उपमहाव्यवस्थापक संतोष गांधी, देवनाथ भट, अर्चना खैरकर, मधुकर गायकवाड, अरुण बडे, संजय गुरुकिले, विवेक वानखडे, प्रणय कोमलकर, समिती सदस्य उमेश अकर्ते, सागर शिंगणे, अंकुश अडगावकर, शशिकांत पात्रे, अरुण जिचकार, प्रवीण वैश्य, राजेश आखेगावकर, दीपक पोहेकर, ऋषिकेश दुर्गेश, सुमित घोम, रविकिरण वाघमारे यांच्यासह अन्य उपस्थित होते. दरम्यान दूरसंचार सल्लागार समितीला मार्गदर्शन करताना खासदार डॉ.अनिल बोंडे म्हणाले, अमरावती विभागातील दूरसंचाराच्या निमित्ताने शेतकरी व लहान ग्राहकांना उद्भवणाऱ्या समस्या वरिष्ठांनी तातडीने सोडवाव्या.

नेट ही प्रत्येक माणसाच्या आयुष्यातील जीवनावश्यक बाब झाली आहे. विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी यांच्यासह अन्यघटक सायबर स्पेस चे मोठ्या प्रमाणात वापर करते झाले आहेत. त्यामुळे, इतर स्पर्धात्मक कंपन्यांच्या तुलनेत भारत संचार निगम लिमिटेडने तशी पॉलिसी निश्चित करून जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचावे. जेणेकरून बीएसएनएलच्या विकासात महत्त्वाचे योगदान देता येईल. बीएसएनएलच्या सुविधांचा केंद्रबिंदू शेतकरी आणि लहान ग्राहक राहिला तर बीएसएनएलचे जाळे विस्तारण्यास मदत होईल असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीदरम्यान ज्या गावांमध्ये बीएसएनएलचे नेटवर्क आहे, तिथे विद्युत पुरवठा खंडित झाल्यावर नेटवर्कमध्ये समस्या निर्माण होत असल्याची बाब समिती सदस्यांनी बैठकी दरम्यान उपस्थित केली. अनेक ठिकाणी बॅटऱ्यांची समस्या असल्याचे पुढे आले आहे. या संदर्भात दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याशी पत्रव्यवहार करून बॅटऱ्यांसंदर्भातील समस्या सोडविण्याचे आश्वासन बैठकीदरम्यान खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी दिले.

# अवैध कृषी पंप कनेक्शनवर महावितरणची कारवाई



> शेतकरी महावितरणच्या सौर ऊर्जा योजनेतून शेतकरी सोलर कनेक्शन घेऊ शकतात, जेणेकरून त्यांना नियमित वीजपुरवठा मिळू शकेल. तसेच, त्यांनी ग्राहकांना चालू व थकीत वीज बिल वेळेवर भरावे. अवैध वीज कनेक्शनवर कठोर कारवाई सुरूच राहील. जर कोणी वीज चोरी करताना आढळला, तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल.
>
> **मनोज टवळारकर,**
> **उप कार्यकारी अभियंता,**
> **अचलपूर महावितरण सिटी 1 विभाग.**

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.18 ) –** अचलपूर महावितरण सिटी 1 उपविभागाच्या अंतर्गत येणाऱ्या परसापूर वितरण केंद्राच्या पाच अंबा परिसरात अवैधरित्या सुरू असलेल्या कृषी पंप कनेक्शनवर महावितरणने मोठी कारवाई केली आहे.

महावितरणकडे अनेक शेती व घरगुती ग्राहकांकडून तक्रारी येत होत्या की, अवैध कनेक्शनमुळे त्यांना पुरेशा प्रमाणात वीज मिळत नाही. अनेक ठिकाणी फीडरवर जादा लोड पडल्याने वारंवार ट्रिपिंग होत होती आणि ट्रान्सफॉर्मरवरही अतिरिक्त ताण येत होता. याच पार्श्वभूमीवर महावितरणने ही कारवाई केली. ही कारवाई उप कार्यकारी अभियंता मनोज टवळारकर यांच्या मार्गदर्शनाखाली परसापूर वितरण केंद्राचे सहाय्यक अभियंता निलेश रोटे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मोहिमेत राजेश बुराडे, निलेश शेवाने, मुकुंद कोटोले, पवन वडूरकर, राहुल मानकर, संतोष एस. मलधाम, किशोर सरदार, प्रविण छापाने, सुशांत नळकांडे, निलेश घरत, मंगेश रामकर, सागर अरबर, समीर खाँ यांनी सहभाग घेतला होता. अवैध कृषी पंप कनेक्शन काढून टाकत नियमित वीज कनेक्शन घेण्याचे आवाहन शेतकऱ्यांना महावितरणकडून करण्यात आले आहे.



# मानवी मूल्यांच्या उत्कर्षासाठी कथा श्रवण करा!

सुरज महाराज पोहोकार यांचे आवाहन

मालखेड येथे शिव महापुराण कथा

गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त आयोजन





**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे,( दि.18 )** - तालुक्यातील मालखेड रेल्वे येथे श्री गजानन महाराज मंदिराच्या प्रांगणात गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त शिव महापुराण कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात कथावाचक हभप सूरज महाराज पोहोकार (आळंदी देवाची) महाराज यांच्या अमृतवाणीतुन शिव महापुराण कथेचे निरुपण सुरू झाले आहे. मानवी मूल्यांच्या उत्कर्षासाठी कथा श्रवण करणे काळाची गरज आहे. त्यातून मानवी जीवनाचे उत्थान होउ शकते, असे प्रतिपादन सूरज महाराज पोहोकर यांनी याप्रसंगी केले. मालखेडच्या अंबादेवी मंदिराचे महंत शिवानंदपुरी महाराज यांच्या मार्गदर्शनात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 20 फेब्रुवारीपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संपूर्ण पूजापाठ, आरतीची जबाबदारी गावातील पंडित संजयपंत जोशी महाराज सांभाळत आहे. दररोज पहाटे श्रींचा अभिषेक करण्यात येतो. ज्ञानेश्वरी वाचन हभप संतोष इंगोले महाराज करतात. नंतर काकडा आरती, शिव कथा, हरिपाठ, तर रात्री 11 पर्यंत हरिकीर्तन होते. या कार्यक्रमासाठी गावातील सर्व गणेशोत्सव मंडळ, दुर्गोत्सव मंडळे तसेच गावातील सर्व भजनी मंडळे, महिला भजनी मंडळे श्रमदान व सहकार्य करित आहे. अरुणेश्वरधाम येथील महंत चंद्रशेखर पुरी महाराज, रुपेश चापले महाराज, नयन पराडकर महाराज, सचिन खापरे महाराज, देविदास जलदेकर महाराज, विठ्ठल महाराज, ज्ञानेश्वर निचत, यश मेश्राम, स्वरूप दुधे, शिवम पोकळे, अथर्व निचत, नक्ष निचत हे शिव कथेला संगिताची साथसंगत करित आहेत.

# परतवाडा-धारणी रस्त्याचे निर्माण कार्य कासवगतीने

**दीड वर्षानंतरही काम पूर्ण होईना | गौरखेडा कुंभी-मल्हारा मार्गावर वाहतूक कोंडी**

## वाहनचालक त्रस्त, बांधकाम विभागाची दिरंगाई



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि. 18 )** - सरकारी काम आणि पाच वर्ष थांब याची प्रचिती परतवाडा - धारणी मार्गाच्या निर्माण कार्याच्या बाबतीत येत आहे. या मार्गावर काही टप्प्यांचे काम दीड वर्षांपासून अत्यंत संथगतीने सुरु आहे. प्रदिर्घ कालावधी होवूनही रस्ता बांधून तयार होत नसल्याने या मार्गावर वाहतुकीची कोंडी होत आहे. प्रामुख्याने गौरखेडा कुंभी-मल्हारा मार्गावर वाहनचालकांना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची दिरंगाई यासाठी कारणीभूत ठरत असून त्याबद्दल रोष व्यक्त करण्यात येत आहे.

अचलपूर तालुक्यातील परतवाडा ते धारणी रस्त्याचे काम सध्या सुरु आहे. परतवाडा पासून जवळच असलेल्या गौरखेडा कुंभी व मल्हारा येथून धारणीकडे जाणा ?या रस्त्याच्या कामाला दीड वर्षांपूर्वी सुरुवात झाली होती. मात्र हे काम अक्षरश- कासवगतीने सुरु असून दिर्घ कालावधीनंतरही रस्ता पूर्णत्वास पोहोचण्याची कोणतीही चिन्हे दिसून येत नाहीत. परतवाडा पासून पुढे पाच ते सहा किलोमीटर रस्त्याच्या बांधकामाला एवढा उशिर लागत असल्याने बांधकाम विभागाबाबत संताप व्यक्त केला जात आहे. गौरखेडा कुंभी व मल्हारा येथील रहिवाशांना या कामामुळे चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे.

दोन्ही बाजूला तीन ते चार फुटाचे चर खोदून त्यात कच्चा मुरुम टाकण्यात आला आहे. मुरमांचे ढीगारे रस्त्याच्या दुतर्फा अस्ताव्यस्त पसरलेले आहेत. त्यामुळे अरुंद रस्त्यावरुन वाहन चालविताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मल्हारा गावातील मुख्य ठिकाणी रस्त्यावर गीट्टी पसरवून ठेवली आहे. त्यामुळे हे ठिकाण अपघाताला आमंत्रण देत आहे. रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठाले खड्डेही पडले आहेत. याबाबत ग्रामस्थांकडून ओरड होत असली तरी रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग पूर्णत- उदासिन दिसून येत आहे.

एकीकडे कमी वेळात जास्त लांबीचे रस्ते बांधण्याचे विक्रम होतं असताना अचलपूर सार्वजनिक बांधकाम विभाग पाच किलोमीटर रस्ता पाच वर्षांत बांधून एक वेगळाच विक्रम स्थापित करणार की काय, अशी चर्चा नागरिकांमधून ऐकायला मिळत आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी एखादा फेरफटका या रस्त्यावर मारून या प्रकरणात लक्ष घालावे अशी स्थानिक नागरिकांचीही मागणी आहे.



"परतवाडा ते धारणी रस्त्याचे काम संथगतीने सुरू आहे. आमच्या गावात ग्रामपंचायत कार्यालय, आरोग्य केंद्र व आठवडी बाजार सुद्धा भरतो. एक वर्षापासून गावातील नागरिकांना या कामामुळे त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत कार्यकारी अभियंता अचलपूर यांना भेटून काम तात्काळ पूर्ण करण्याची विनंती करण्यात आली आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष चालविले आहे.

**नारायण बोरेकार**
**सरपंच ग्रामपंचायत मल्हारा**



"गौरखेडा कुंभी येथे या रस्त्याचे काम एक ते दीड वर्षापासून सुरु असल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या असून रस्त्यावर अपघात झाले आहेत. रस्त्यावर मोठाले खड्डे पडले आहेत ते सुद्धा बुजवले गेले नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सदर कामांसाठी कंत्राटदारा सोबत मिलीभगत तर केली नाही ना? तसं नसेल तर लवकरच सदर रस्त्याचे काम पूर्ण करून देण्यात यावे.

**मुरलीधर पडोळे**
**ग्रामपंचायत सदस्य, गौरखेडा कुंभी**

# स्काउट-गाईड मेळाव्यात एकविरा शाळेने पाडली छाप



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि.18 )**- अमरावती जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग आणि अमरावती जिल्हा स्काउट-गाईड कार्यालयाच्या वतीने नूकतेच भातकुली येथील माध्यमिक आदिवासी आश्रम शाळेत तीन दिवसीय जिल्हास्तरिय स्काउट-गाईड मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात दर्यापूर येथील एकविरा स्कूल ऑफ ब्रिलियंट्सच्या स्काउट - गाईड पथकाने सक्रिय सहभाग घेउन आपली छाप सोडली.

या मेळाव्यात जिल्हाभरातील अनेक शाळांचे पथक सहभागी झाले होते. एकविरा शाळेच्या स्काउट-गाईड पथकाने विविध स्पर्धांमध्ये सहभागी होवून उत्कृष्ठ प्रदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेउन सादरीकरणाद्वारे सर्वांची वाहवा मिळविली. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेच्या पथकाला प्रोत्साहनपर पूरस्कारही प्राप्त झाला. शाळेच्या क्रीडा शिक्षिका दीपिका गुलवाडे, विजय शिरसाट, अर्चना साखरे यांच्या मार्गदर्शनात एकविरा शाळेचे स्काउट-गाईड पथक या जिल्हास्तरिय मेळाव्यात सहभागी झाले होते. शाळेचे प्राचार्य लिझेश रामकृष्णन व शाळेच्या विश्वस्त मंडळाने विद्यार्थ्यांचे कौतूक केले आहे.

# गजानन महाराज प्रगटदिनी शासकीय सुट्टी जाहीर करा

## अंजनगाव बारीच्या श्री भक्तांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.18 )**- शेगाव येथील श्री संत गजानन महाराज यांचा प्रगट दिन संपूर्ण विदर्भासह महाराष्ट्र राज्यात ठीक ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. सर्व अबालवृद्ध स्त्री-पुरुष गजानन भक्त श्रींच्या प्रगट दिन महोत्सवात उत्साहाने सहभागी होतात. त्यामुळे प्रगट दिनाच्या दिवशी शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी अंजनगाव बारी येथील गजानन भक्तांनी केली आहे.

श्री संत गजानन महाराजांचे लीला स्थळ असलेले श्री क्षेत्र शेगाव आज विदर्भाची पंढरी म्हणून ओळखले जाते. राज्यभर गजानन महाराजांचा मोठा भक्त संप्रदाय आहे. महाराजांचा प्रगट दिन महोत्सव दरवर्षी मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. ठिकठिकाणी भव्य स्वरूपात महोत्सव व कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदा 20 फेब्रुवारी रोजी श्री गजानन महाराजांचा प्रगट दिन आहे. त्यानिमित्त सर्वत्र महोत्सव साजरा केला जात आहे. प्रगट दिनाच्या दिवशी लाखो भक्त महाराजांच्या दर्शनासाठी शेगावला जात असतात. सर्व गजानन भक्तांच्या सुविधेसाठी प्रगट दिनानिमित्त शासकीय सुट्टी जाहीर केली जाणे आवश्यक आहे, असे श्री गजानन भक्तांचे म्हणणे आहे. या संदर्भात अंजनगाव बारी येथील गजानन भक्त व सामाजिक कार्यकर्ते प्रमोद निचत यांनी जिल्हाधिकारी व जनप्रतिनिधींना निवेदनही सादर केले आहे. जिल्हाधिकारी स्वत:च्या अधिकारात तीन सुट्ट्या देऊ शकतात.

# राजाराम प्रतिष्ठानतर्फे आज शिवजन्मोत्सव सोहळा!



**अमरावती** - राजाराम प्रतिष्ठान आणि शिवभक्तांच्या वतीने विदर्भातील भव्य दिव्य शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. आज, 19 फेब्रुवारी 2025 रोजी सायंकाळी 6 वाजता, हर्षराज चौक, विद्युत नगर, अमरावती येथे हा सोहळा संपन्न होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किरण महल्ले (अध्यक्ष, राजाराम प्रतिष्ठान, अमरावती) उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख अतिथी म्हणून आमदार तथा भाजप अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील आणि आमदार सुलभा खोडके यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच टायगर ग्रुप महाराष्ट्राचे अध्यक्ष तानाजी जाधव आणि शिवभक्त प्रतिष्ठान, पुणे चे अध्यक्ष अनिकेत घुले हे विशेष अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत. या सोहळ्यात प्रसिद्ध वक्ते सोपान कनेरकर यांचे प्रेरणादायी व्याख्यान होणार असून, छत्रपती ढोल ताशा व ध्वज पथक, अमरावती यांचे भव्य सादरीकरण पाहायला मिळणार आहे. राजाराम प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष ऋषिकेश देशमुख यांनी अमरावतीतील शिवप्रेमींना मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याची शोभा वाढविण्याचे आवाहन केले आहे.




# कृषी प्रदर्शनीच्या माध्यमातून शेतकरी ते ग्राहक उद्देश साध्य झाला!

**खा. बळवंत वानखडे, जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शनीचा समारोप**




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.18 )**- जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शनीच्या माध्यमातून इतर ठिकाणची पिके, नवतंत्रज्ञान यासोबतच शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तू ग्राहकांपर्यंत पोहोचल्या आहेत. त्यामुळे प्रदर्शनीचा उद्देश सफल झाला असून प्रदर्शन फलदायी ठरले असल्याचे मत खासदार बळवंत वानखेडे यांनी व्यक्त केले.

जिल्हास्तरीय कृषि प्रदर्शनीचा समारोप मंगळवारी (ता.18) करण्यात आला. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते, आत्माच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुनील सोसे, प्राचार्य अनिल ठाकरे, हरिभाऊ मोहोड, राजीव ठाकूर, विनय बोथरा आदी उपस्थित होते. खा. वानखेडे यावेळी पुढे म्हणाले, प्रदर्शनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना इतर ठिकाणची पिके पहावयास मिळाली. तसेच उत्पादनावर प्रक्रिया करून स्वत- माल विकण्याची संधी प्रदर्शनीच्या माध्यमातून मिळाली. याठिकाणी शेतीमध्ये बदलत असलेल्या नवीन तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली.

या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असे हे प्रदर्शन झाले असल्याचे सांगितले. प्रदर्शनीला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. तसेच नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर भेटी दिल्या. त्यामुळे वितरकही समाधानी झाले. शेतकऱ्यांनी त्यांच्या उत्पादनाचे स्वत: मार्केटींग करून यशस्वी व्हावे, असे आवाहन लहाळे यांनी केले. निस्ताने यांनी 288 स्टॉलच्या माध्यमातून 381 शेतकऱ्यांनी प्रदर्शनीत सहभाग नोंदविला. 50 हजार नागरिकांनी भेटी दिल्या, तर 70 लाखांची उलाढाल झाली असल्याचे सांगितले. सुरूवातीला पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

ड्रोन पायलट निमिका सुरेश दोडी, पाकसाड काटपिडीया, अमित जयसिंगपूरे यांचा सत्कार करण्यात आला. प्रदर्शनीमध्ये सहभागींना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. निलेश राठोड यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

## निवृत्त न्यायाधीश करणार चौकशी

**अमरावती** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात अनियमितता झाल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेत स्थापित चारसदस्यीय समिती चौकशी करणार आहे. या समितीला तीन महिन्यांत शासनाला चौकशी अहवाल सादर करावा लागणार आहे. या अनियमिततेबाबत राज्य शासनाकडे तक्रार करण्यात आली आहे.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील अनेक गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती मारोतीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने बुधवार, 12 फेब्रुवारीला चौकशी समितीची पुनर्रचना केली आहे.

